**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय**

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**

**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**जा.क्र.** योजनेचा तपशील/1436/2026-27 दिनांक - 10/08/2026

# सन 2026-27 या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांचा तपशील

इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर तसेच वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर मार्फत सन- 2026-27 करीता खालील नमुद परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत ऑफलाईन व अनिवासी पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याकरीता इच्छूक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | महाज्योती | वनार्टी |
|---|---|---|
| 1 | संघ लोकसेवा आयोग प्रशिक्षण | संघ लोकसेवा आयोग प्रशिक्षण |
| 2 | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) प्रशिक्षण | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) प्रशिक्षण |
| 3 | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा प्रशिक्षण | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा प्रशिक्षण |
| 4 | महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क प्रशिक्षण | महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क प्रशिक्षण |
| 5 | विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थ्यांकरीता संघ लोकसेवा आयोग प्रशिक्षण | भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांकरीता संघ लोकसेवा आयोग प्रशिक्षण |
| 6 | विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थ्यांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) प्रशिक्षण | भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) प्रशिक्षण |
| 7 | विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थ्यांकरीता लष्करातील सैनिक भरती प्रशिक्षण | भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांकरीता लष्करातील सैनिक भरती प्रशिक्षण |

- **योजनेच्या लाभासाठी पात्रता व निवड प्रक्रिया**:-

1. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
2. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
3. विद्यार्थ्यांने लष्करातील सैनिक भरती प्रशिक्षणाकरीता इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावा/असावी.

4. विद्यार्थ्यांने UPSC/MPSC प्रशिक्षणाकरीता पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावा/असावी.
5. प्रशिक्षणाकरीता लाभार्थी विद्यार्थ्याची अंतिम निवड चाळणी परिक्षेद्वारे करण्यात येईल.
6. उपरोक्त नमुद प्रशिक्षणांच्या पुर्व परीक्षेच्या धर्तीवर सामान्य अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
7. चाळणी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत स्वतंत्रपणे महाज्योतीच्या व वनार्टीच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.
8. चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांकनानुसार मेरीटच्या आधारे व आरक्षित जागांच्या प्रमाणात पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या व वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
9. वयोमर्यादा :-
    1) संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा /अभियांत्रिकी /संयुक्त गट ब व क) - 19 ते 30
    2) लष्करातील सैनिक भरती - 17 ते 19

➢ **प्रशिक्षणाचे स्वरूप** :

1. विद्यार्थ्यांना परीक्षांच्या अभ्यासक्रमानुसार संघ लोकसेवा आयोग (नागरीसेवा), महाराष्ट्र लाकसेवा आयोग (राज्यसेवा), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा व महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क तसेच लष्करातील सैनिक भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्यात येईल.
2. प्रशिक्षण अनिवासी स्वरुपाचे असेल.
3. प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपात देण्यात येईल.

➢ **अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**:

1. आधार कार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र (Cast Certificate)
3. रहिवासी दाखला (Domicile Certificate)
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
5. इयत्ता 10 वी चे प्रमाणपत्र/गुणपत्रिका
6. पदवीचे प्रमाणपत्र/गुणपत्रिका
7. दिव्यांगाचे प्रमाणपत्र (दिव्यांग असल्यास)
8. अनाथ असल्यास दाखला

➢ **अर्ज कसा करावा** ?

1. महाज्योतीच्या तसेच वनार्टीच्या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application for Competitive Training Program - 2026-27 Training"** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत तपशीलात नमुद सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन जोडावे.
3. विद्यार्थ्यांने अर्जामधील दिलेली सर्व माहिती पूर्ण भरायची आहे त्याशिवाय योजनेकरीता नोंदणी अर्ज वैध मानले जाणार नाही.

➢ **अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.23/08/2026 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती तसेच वनार्टी यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या दरम्यान किंवा प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास निवड रद्द करण्यात येईल.
5. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक असून विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे विद्यावेतन त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येण्यात येईल.
6. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास कार्यालयीन वेळेत महाज्योतीच्या व वनार्टीच्या Call Centre वर संपर्क करावा.

➢ **विशेष नोट** :-

1. विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजातील विद्यार्थी महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व साधारण प्रशिक्षणाकरीता तसेच गोवारी समाजातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या विशेष प्रशिक्षणाकरीता अर्ज सादर करू शकतो.
2. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थी महाज्योती व वनार्टी या दोन्ही प्रशिक्षण संस्थेस अर्ज सादर करू शकतो.
3. भटक्या जमाती क प्रवर्गातील विद्यार्थी महाज्योती व वनार्टी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्वसाधारण प्रशिक्षणाकरीता तसेच वनार्टी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष प्रशिक्षणाकरीता अर्ज सादर करू शकतो.

**संपर्क क्र**. :- 1) **महाज्योती** - 0712-2870120/21 2) **वनार्टी** - 7887882026

स्वा
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

स्वा
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.